# प्राचार्यांचे मनोगत

महावीर महाविद्यालयाचा प्राचार्य म्हणून माझी जुलै २०१० मध्ये निवड झाली व एका नामांकित संस्थेच्या नामांकित महाविद्यालयाचा प्राचार्य म्हणून काम करण्यासाठी संधी मिळाली हे मी माझे सद्भाग्य समजतो. संस्थेने माझ्यावर जबाबदारी देऊन जो विश्वास दाखवला त्याबद्दल मी ऋण व्यक्त करता. त्याचबरोबर या वर्षाचा "देशभूषण" वार्षिकांक आनंदाने आपल्या हाती सुपूर्द करतो.

यापूर्वीच्या प्राचार्यांनी आपल्या कार्यातून संस्थेची तसेच महाविद्यालयाची गुणवत्तापूर्ण व गौरवपूर्ण परंपरा कायम ठेवली आहे. ही परंपरा येथून पुढे मी कायम ठेवण्याची व संस्थेचा लौकिक वाढवण्याची जबाबदारी माझ्यावर आली आहे. त्यासाठी मी संस्था, सर्व शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या सहकार्यातून हा लौकिक वाढविण्यासाठी प्रयत्न करीन.

पुढील वर्षी आमचे महाविद्यालय नॅकच्या पुनर्मूल्यांकनाला सामोरे जात आहे. ऑगष्ट/सप्टेंबर २०११ च्या दरम्यान या मूल्यांकनासाठी आम्ही सिध्द होण्याच्या तयारीत आहोत. आमचे महाविद्यालय गुणवत्ता, सांस्कृतिक परंपरा व भौतिक सुविधांमध्ये सज्ज असून, संशोधन व गुणवत्तेच्या क्षेत्रात लौकिकास पात्र आहे. यावर्षी या सर्व क्षेत्रात महाविद्यालयाने गौरवपूर्ण यश संपादन केले आहे. भूगोल विभागाने दोन राष्ट्रीय कार्यशाळा आयोजित केल्या. एक विद्यापीठस्तरीय अभ्यासक्रम चर्चासत्र आयोजन केले. अग्रणी महाविद्यालयांतर्गत मानसशास्त्र, शिक्षणशास्त्र व समाजशास्त्र या विषयांच्या कार्यशाळा पार पडल्या. सन २०१०-११ ते सन २०१२-१३ या तीन वर्षासाठी शिवाजी विद्यापीठाने आमच्या महाविद्यालयाच्या बी.ए.बी.एड्. विभागाची अग्रणी महाविद्यालय म्हणून निवड केली आहे. ही बाब गौरवास्पद आहे. या अंतर्गत कार्यालयीन कर्मचाऱ्यांच्यासाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. महाविद्यालयाच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्राला "गुणवत्तापूर्ण अभ्यासकेंद्र" म्हणून यावर्षी सम्मानित केले आहे.

क्रिडा विभागानेही आपला लौकिक कायम राखत राष्ट्रीय, राज्यस्तरीय, विभागीय व आंतरविभागीय विद्यापीठस्तरीय क्षेत्रात आपली गुणवत्ता कायम ठेवली आहे. महाविद्यालयाचा एन.सी.सी. (मुले व मुली) विभाग म्हणजे मानाचा तुरा आहे. या दोन्ही विभागत छात्रसैनिकांनी दरवर्षीप्रमाणे शिष्यवृत्ती, राष्ट्रीय पुरस्कार मिळविले असून राष्ट्रीय, राज्यस्तरीय कॅम्प मधील त्यांचा सहभाग अभिनंदरास पात्र आहे.

मुलींचे वसतिगृह पूर्ण झाले असून येत्या शैक्षणिक वर्षात ७८ मुलींची सोय तेथे हाईल. या वर्षी महाविद्यालयास यु.जी.सी. कडून २५ लाख अतिरीक्त अनुदान प्राप्त झाले असून "डिजीटल क्लासरुम" ही संकल्पना आम्ही प्रत्यक्षात

आणणार आहोत. त्याचबरोबर नव्या तंत्रज्ञानाचा वापर अध्ययन व अध्यापनात केला जाणर आहे. "सायकल बॅंक" उपक्रमाव्दारे गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना २२ सायकली प्रदान करण्यात आलेल्या आहेत. टेक्नॉलॉजी लॅब व भाषा प्रयोगशाळा तयार करण्यात आलेल्या आहेत. प्राचार्य कक्ष व कार्यालयाचे आधुनिकीकरण झालेले असून त्यामुळे कार्यालयीन काम सुलभ व कार्यक्षमपणे होण्यास मदत झालेली आहे.

"देशभूषण" नियतकालिकाने गतवर्षी विद्यापीठ स्तरावर व्यक्तिगत गटात आठ बक्षीसे मिळविली असून या वर्षाच्या नियतकालिकाचे अंतरंग, वैचारिक लेख, सामाजिक व साहित्यिक मूल्य जपणारे आहे. विद्यापीठ स्तरावर सातत्याने पारितोषिक मिळविणारे आमचे "देशभूषण" नियतकालिक याही वर्षी आपली परंपरा अखंडीत ठेवेल याबाबत मला तीळमात्र शंका नाही. संपादक मंडळाचे अथक प्रयत्न माझ्या नजरेसमोर असल्यामुळे त्यांचे परीश्रम हेच यशाचे बळ असेल असे मला वाटते. नॅकच्या पुनर्मूल्यांकनासाठी संस्था, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी व पालक या सर्वांच्या सहकार्याने सामोरे जाऊन महाविद्यालयाला उत्कृष्ट दर्जा प्राप्त होईल असा माझा दृढ आशावाद आहे.

या वर्षीचा "देशभूषण" वार्षिकांक सर्व वाचक, विद्यार्थी व महाविद्यालयाचे हितचिंतक यांच्या पसंतीस निश्चितपणे उतरेल. या अंकासाठी माझ्या हार्दिक शुभेच्छा !

दिनांक - २५ एप्रिल २०११

डॉ. संभाजीराव कणसे

प्राचार्य